Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# भारतीय लोकशाहीतील मतदान प्रक्रिया

**प्रा.डॉ. अंकुशराव अंबादासराव चव्हाण**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
मत्स्योदरी कला महाविद्यालय,
तिर्थपुरी, ता. घनसावंगी, जि. जालना

आपल्या सामाजिक आर्थिक आणि राजकिय जीवनाची उदिष्टय साध्य करण्यासाठी कोण कोणत्या मार्गाचा व कार्य पध्दतीचा अवलंब करावा हे सांगणारा एक जीवन मार्ग म्हणजे लोकशाही होय. लोकशाही ही न्याय स्वातंत्र्य समता, बंधुभाव संहिष्णुता परस्पर सहकार्य या जीवन मुल्यावर आधारीत असणारी एक नैतिक संकल्पना आहे. या संकल्पनेवर आधारीत शासन उत्कष्ट ठरु शकते हे त्यामागचे तत्वज्ञान आहे.

लोकशाही आज संपुर्ण जगात लोकप्रिय बनली आहे, लोकांचे लोकांनी लोकाकरीता चालविलेले शासन म्हणजे लोकशाही ही लोकशाहीची व्याख्या मान्यता पावलेली आहे. मानव हा सामाजीक व राजकीय प्राणी आहे असे ॲरिस्टॉटलने म्हटले आहे राज्याचा सामाजिक करार सिध्दांत मांडताना थॉमस हौब्जने म्हटले होते. राजकीय समाज म्हणजे सामाजीक कराराची निषत्ती होय डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते आपण आपली राजकीय लोकशाही उत्तम अशी सामाजिक लोकशाही बनवली पाहिजे. स्वातंत्र्य समता आणि बंधुता या जीवनातील तत्वांना मान्यता देणे लोकशाही ही जीवन पध्दती आहे, ती केवळ शासन पध्दती नाही स्वतंत्र भारतातील लोक प्रतिनिधिनी साम्राज्यवादी राज्यकर्त्याचा वारसा पुर्णपणे सोडलेला नाही. दर पाच वर्षानी निवडणुका घेवून जनमत आजमाविणे म्हणजे लोकशाही नव्हे, भारतातील लोकशाही शासन हे लोकांकडून निवडलेले आहे परंतु लोकांकरीता आहे याचा विसर पडत चालला आहे स्वातंत्र, समता, बंधुता या लोकशाही तत्वाच्या बाबतीत विचार केल्यास वास्तवता वेगळी दिसते.

निवडणूक ही लोकशाही मध्ये महत्वाची भुमिका बजावते निवडणुकीच्या मान्यतानुसार (शासनात)जनतेची भागीदारी व्यक्त होते. या बरोबरच निवडणुकीतुन जनता नेत्यांवर नियंत्रण व राज्य करण्याची परवानगी देते. निवडणुकीच्या माध्यमातुन लोकांच्या सार्वभौमत्वाची अभिव्यक्ती होते. संसदीय लोकशाही मध्ये तर जनतेच प्रतिनिधीत्व करणारी संसद सार्वभौम असते म्हणून मुक्त निर्भय आणि खुल्या मतदानाला महत्व प्राप्त होते पण राजकारणांची एक विडंबना अशी आहे की निवडणुक

प्रक्रियेवरती कोणत्याही प्रकारचे जनतेचे नियंत्रण नाही किंवा अशी कुठली संघटना नाही की ज्या दवारे निवडणुक प्रक्रियेवर अंकुश ठेवला जाईल म्हणुनच निवडणुकीच्या माध्यमातुन काही गैर गोष्टीचा शिरकाव शासन प्रक्रियेमध्ये होण्याचा संभव असतो. राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे अशाच माध्यमातुन लोकशाही समोर एक आव्हान ठरत आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीला न शोभणारी गोष्ट आहे. गुंड प्रवृत्तीचे लोक निवडणुकामध्ये जास्तीच्या पैशाच्या जोरावर शक्तीचा वापर करुन मतदान केंद्र ताब्यात घेणे, हिंसा करणे, दंगली घडविणे अशा विविध प्रकारे पुर्ण लोकशाही प्रक्रियेलाच खीळ घालत आहे. आश्चर्याची गोष्ट अशी आहे की राजकीय पक्ष गुन्हेगारी पार्श्वभुमी असणा-या व्यक्तीला उमेदवारी देतात व जनता ही त्यांना निवडुण देते, संसद आणि राज्य विधानसभे सारख्या सर्वोच्च शासन अंगाचे सदस्य गुन्हेगार बनत आहेत.

थोडक्यात सांगायचे म्हणजे भारतात जर लोकशाही यशस्वी व्हावयाची असेल तर जनप्रतिनिधीची निवड विचारपुर्वक होणे आवश्यक आहे परंतु प्रचलीत लोकशाही व्यवस्थेत पैशाच्या जोरावर उमेदवार निवडुण येतानां दिसतात. लोकशाहीच्या नावाखाली राजकीय नेत्यांनी सुरु केलेले हे राजकीय गुन्हेगारी करण करण्यास मुळात जनताच जबाबदार आहे लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी अपक्ष सदस्यांचा वाढत्या संख्येला प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या येथील सर्वसामान्य जनताच जबाबदार असल्याचे दिसते. कारण अल्प शिक्षीत भृष्ट व गुंड सदस्याची संख्या मागील वर्षात संसद व राज्य विधी मंडळात असणे हा देखील लोकशाहीच्या विकासात फारमोठा अडथळा आहे.

## निवडणुक आयोग व निवडणुक प्रक्रिया :-

निवडणुकीची कायदेशीर सुरुवात १९५२ पासुन भारतात झाली आहे. वस्तुतः सुरुवातीला निवडणुक प्रक्रियेत अनेक अडचणी येत होत्या ज्यात उच्च जातीचे वर्चस्व, शिक्षणाचा अभाव, गरीबी, माहिती तंत्रज्ञानाचा अभाव यासारख्या प्रमुख समस्या निवडणुक प्रक्रियेत महत्वाच्या अडचणी होत्या, काळानुसार मतदान प्रक्रियेत हिंसा, राजकीय अपराध, मतदान केंद्राची लुट, प्रशासनाचा गैरवापर, शासकीय संपत्तीचा गैरवापर, यासारख्या प्रमुख समस्यांनी भारतातील निवडणुक प्रक्रिया नेहमीच चर्चेचा विषय बनत असल्याचे दिसते भारतीय संविधानातील कलम ३२४ मध्ये स्वतंत्र व निपक्ष निर्वाचन आयोगाचे वर्णन केले तर कलम ३२६ मध्ये वयस्क मताधिकाराचे उल्लेख आहे. भारतीय लोकशाही जी राजकीय सामाजीक आर्थिक गुणांनीयुक्त आहे. जिथे ७०० मिलियन मतदार एक मिलीयन पोलींग केंद्र आहे म्हणून एका महापर्वाप्रमाणे निवडणुकाचे संचालन करणे गरजेचे आहे. निपक्ष व स्वतंत्र निवडणुका घेणे हे एक आव्हान आहे. लोकशाही व्यवस्था ही सामान्य माणसांवर विश्वास ठेवते त्यामुळे सामान्य लोकांनी राजकीय, प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे. त्यावरच लोकशाहीचे यश अवलंबुन आहे.

१४ व्या लोकसभेच्या निवडणुकीत सरासरी ५५ टक्के मतदान झाल्याचे दिसुन येते. याचा अर्थ ४५ टक्के लोकांनी लोकशाहीच्या सर्वाधिक महत्वाच्या प्रक्रियेतुन स्वतःला अलिप्त ठेवण्याचे हे कृत्य केवळ बेजबाबदारपणाचे नसून प्रचलीत शासन प्रणालीला नाकारण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक ठिकाणी असेही दिसून आले मतदार मतदानासाठी बाहेरही पडले परंतु मतदान यादीत त्यांचे नावच नव्हते मतदानाची इच्छा असून देखील प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ब-याच लोकांना मतदानाचा हक्क बजावता आला नसल्याचे दिसते. तसेच, एकुण मतदानाची टक्केवारी ही कमी राहिली ही वस्तुस्थिती ही आहे.

मतदान प्रक्रिया व जनतेची उदासिनता :-

भारतीय लोकशाही व्यवस्थेने उपलब्ध करुन दिलेले सारे कायदे सर्व सवलती लाटायच्या आणि व्यवस्थेच्या नावानेच खडे फोडीत मतदानाला नकार द्यायचा ही दुहेरी वागणुक या व्यवस्थेच्या मुळावरच उठणारी आहे. त्यामुळे सगळ्यानीच स्वयंस्फुर्तीने मतदान करायला हवे नसता ते कायद्याने करवून घेतले पाहिजे मतदानाची घटती टक्केवारी ५० टक्के लोकांना ती मान्य नसल्याचा घातक संदेश देते. सामान्य माणसाचा आवाज मतदानातुन पोहचने अपेक्षीत आहे. पण ७० कोटी मतदारापैकी ५० टक्के पेक्षा जास्त लोक मतदानच करणार नसतील तर व्यवस्थे विषयी संभ्रम निर्माण होतो.भारताकडे आज आदर्श लोकशाही म्हणून पाहिल्या जाते तरीही यातील कमतरता आणि उणिवा दुर करण्यासाठी प्रयत्न करायला हवे. भारतीय मतदारामधील मतदाना विषयीची मानसिकता भावी भारतीय लोकशाहीसाठी घातक ठरणारी आहे लोकशाही व्यवस्थेत जनतेच्या राजकिय सहभागाला विशेष महत्व असते. आपल्या राजकीय प्रक्रियेत जास्तीत जास्त नागरीकांनी सहभागी व्हावे असा लोकशाहीचा प्रयत्न असतो लोकशाही व्यवस्था ही सामान्य माणसांवर विश्वास ठेवते त्यामुळे सामान्य लोकांनी राजकीय प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे.

ग्रीस, ऑस्ट्रेलिया, बेल्जीयम, ब्राझील या देशामध्ये कायदयाने मतदान करावेच लागते त्यामुळे या देशात ८५ ते ९० टक्यापेक्षा जास्त मतदान होतांना दिसून येते मात्र ऑस्ट्रीलीया, इटली, जर्मनी, नेदरलॅंड, स्वीडन, यासह युरोपातील बहुतांश राष्ट्रे, न्युझीलॅंड, दक्षिण कोरिया या देशामध्ये मतदानाची सक्ती नसतांनाही मतदानाचे प्रमाण चांगले राहिले आहे मात्र भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष होऊन गेल्यानंतर भारतीय समाजात अशी प्रगल्भता निर्माण होणे अपेक्षीत आहे. त्यासाठी लोकशाहीची मुल्य समाजात चांगल्या प्रकारे रुजविण्यासाठी आणि त्याचे महत्व लक्षात आणून देण्यासाठी लोकांत त्यासंबंधी जाणीव व जागृती घडवून आणण्याची गरज आहे कारण लोकशाहीचे यश त्यावरच अवलंबून आहे.

एखाद्या व्यक्तीने विधानसभा, लोकसभा निवडणुकीत मतदान केले नसेल तर राज्यशासनाच्या, केंद्रशासनाच्या अंतर्गत येणा-या सवलती उदा. वीज, वाहन परवाना, राशनकार्ड, इत्यादी पासून त्याला वंचीत रहावे लागेल, रेल्वे आरक्षण, विदेशी प्रवास, बॅकेत खाते, इत्यादी पासून त्याचे कुटूंब वंचीत रहिल असे कायदे केले गेले पाहिजेत. तात्पर्य असे आहे की, मतदान १०० टक्के होण्यासाठी राबविल्या जाणा-या उपक्रमातुन मुळ उद्देशा सोबतच अनेक बाबी साध्य होतील यासाठी सर्व राजकीय पक्षांनी देखील पुढाकार घेण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथः**


१. Wadia A. R. Democracy and society, Lalvani Publishing house, Bombay 1966 page -4
२. Ambedkar B. R. Theory and Practice of Democracy, Democracy in India (Ed) k.p. Karunakaran Intellectual Book Corner, New Delhi 1978, Page no. 122.
३. आशिव दि एम. डी. कृष्णकांत मिश्र – राजनिती विज्ञान, एस. चंन्द ॲण्ड कंपनी लि. नई दिल्ली २००७.
४. साठे एस, भारताच्या राज्यघटनेची ५० वर्षे, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे – २००४
५. पोहरे पी. मतदान अनिवार्य केल्याशिवाय पर्याय नाही, संपादकीय, दैनिक पुण्यनगरी ०२ सप्टेबर २०११
६. पळशीकर एस. समकालीन भारतीय राजकारण, प्रतिमा प्रकाशन पुणे – २००४.
७. अरुण सारथी – भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने, रविराज प्रकाशन